**वादपत्र नि.क्र.०१** (१) नियमीत दिवाणी दावा क्रमांक **७५/२०१७**
रामचंद्र सदू रेवणे वि. शंकर जंगम + ११

**<u>वादपत्र निशाणी क्रमांक ०१ वर आदेश</u>**
(पारीत केल्याची तारीख **०४.११.२०१७**)

**०१.** वादी व वादीतर्फे विधीज्ञ श्री. आर. बी. सावंत हजर. प्रतिवादी क्रमांक ०४ हजर. प्रतिवादी क्रमांक १२ गैरहजर.

**०२.** प्रतिवादी क्रमांक ०४ ला समन्स व नोटीस **<u>नि.क्र.१० व ११</u>** तसेच प्रतिवादी क्रमांक १२ ला दावा समन्स **<u>नि.क्र.१४</u>** व नोटीस **<u>नि.क्र.१५</u>** ची बजावणी बेलिफ अहवालानुसार दिनांक **११.१०.२०१७** रोजी झाली आहे. प्रतिवादी क्रमांक ०४ व १२ दिनांक **१६.१०.२०१७** रोजी हजर झाले आहेत. आज त्यांनी मुदत अर्ज दिला नाही किंवा म्हणणे व कैफियत दाखल केली नाही.

**०३.** प्रतिवादी क्रमांक ०४ व १२ यांनी **<u>दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा क्रम ०८ नियम ०१ सह वाचनीय क्रम ०५ नियम ०१</u>** नुसार मुदतीत म्हणणे व कैफियत दाखल केली नाही. म्हणून त्यांच्या विरुद्ध **<u>दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा क्रम ०८ नियम १०</u>** नुसार दावा **‘‘विना म्हणणे व विना कैफियत’’** चालवण्याचा आदेश पारीत करणे न्यायाचे होईल. म्हणून खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>आ दे श</u>**

**०१.** प्रतिवादी क्रमांक ०४ व १२ यांनी मुदतीत म्हणणे व कैफियत दाखल केली नाही म्हणून त्यांच्या विरुद्ध **<u>दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा क्रम ०८ नियम १०</u>** नुसार दावा **‘‘विना म्हणणे व विना कैफियत’’** चालवण्यात येतो.

**---स्वाक्षरी---**
**(सुभाष ल. फुले)**
**(एम एच आर जी ०००९ - २१२५)**
**दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, रोहा.**
**जिल्हा रायगड.**

**स्थळ : रोहा**
**दिनांक : ०४.११.२०१७.**